

Vidya Prasarak Mandal's

# DR. GHALI COLLEGE, GADHINGLAJ

Affiliated to Shivaji University

## विद्या प्रसारक संचालित

# डॉ . घाळी कॉलेज, गडहिंग्लज

# क्रीडा अहवाल २०२३-२४

---

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये क्रीडा विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या एकूण क्रीडा सहभाग व व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने भरीव प्रयत्न केले गेले . सुरवातीलाच महाविद्यालयामध्ये खेळाडूंचा प्रवेश वाढावा यासाठी वेगवेगळ्या सुविधा त्यांच्यासाठी देण्यात आल्या , जसे कि अनुदानित वर्गातील प्रवेश फी मध्ये पूर्ण तर विनाअनुदानित वर्गासाठी ५० टक्के फी सवलत देण्यात आली . परिणामी या वर्षी एकूण ३६ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला . या वर्षी वेगवेगळ्या स्तरावर झालेल्या व महाविद्यालयाने आयोजित केलेल्या क्रीडा प्रकारामध्ये एकूण ८३० खेळाडूंनी सहभाग घेतला. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठ विभागीय , आंतरविभागीय,पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ ,,अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धामध्ये एकूण १५ क्रीडा प्रकारात सहभाग घेतला ,तर महाविघालयाच्या वतीने मुलांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी व त्यांच्यामध्ये असलेला क्रीडा प्रज्ञा शोध घेता यावा यासाठी वार्षिक क्रीडा स्पर्धा व डॉ घाळी श्री शरीर सौष्ठव स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते . खो खो ,कबड्डी , जलतरण ,हॉकी,मैदानी स्पर्धा ,सायकलिंग , तायक्वांदो ,क्रॉस कंट्री , क्रिकेट ,कुस्ती , वेट लिफ्टिंग ,बुद्धिबळ इत्यादी खेळ बाबींचा यामध्ये समावेश होता. तसेच या वर्षी पश्चिम विभागीय व अखिल भारतीय स्पर्ध्येसाठी एकूण ९ खेळाडूंची शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली. दर वर्षी मुलांचा खेळातील सहभाग वाढत आहे . यासाठी आमच्या संस्थेचे अध्यक्ष व सर्व संचालक जिमखाना विभागाला मोठी आर्थिक तरतूद करून देत आहेत .ज्याच्यामाध्यमातून आम्ही प्रत्येक खेळाडूला लागणारे क्रीडा साहित्य महाविद्यालयामार्फत मोफत पुरवतो तसेच विशेष उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना आर्थिक प्रोत्साहन दिले जाते . महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विविध क्रीडा स्पर्धात पुढील प्रमाणे यश मिळवले.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय मैदानी स्पर्धेत कु ऋतुजा पाटील बी एस. सी. भाग १ हिने 10 किलोमीटर धावणे प्रकारात 38 मिनिट वेळ देऊन रौप्य पदक पटकावले, तसेच मुलींच्या रिले संघाने ४×४०० मीटर धावणे प्रकारात कास्य पदक पटकाविले तर मुलांच्या संघाने रौप्य पदक पटकावले मुलींच्या संघामध्ये ऋतुजा विजय पाटील. बी एस सी भाग- एक ,स्नेहल राजेंद्र चोरगे- बी ए भाग १,अनुजा महादेव कापसे -बी ए भाग १,आकांक्षा जयसिंग गोडसे- एम कॉम भाग १, स्नेहा बसवराज मोळदी -बी ए भाग १ तसेच मुलांच्या संघामध्ये तेजस राऊत- बी ए भाग १,सागर मगदूम - बी कॉम भाग २,अभिजित पाटील- एम कॉम.भाग १,येलाप्पा शिंदे - बी कॉम भाग २ ,ऋतुराज पाटील बी एस सी भाग -१ यांचा सहभाग होता.








(इस्लामपूर) ईश्वरपूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय महिला हॉकी स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या संघाने सलग दुसऱ्यांदा विजेते पद पटकावले . यामध्ये प्रणाली संजय मोरे - बी कॉम भाग १,शुक्रवेली अनाप्पा हेशागोळ - बी कॉम भाग २,सानिका सज्जन नगरे -बी कॉम भाग १,अनुदी अजित चव्हाण - बी कॉम भाग १,महानंदा सिद्धाप्पा मस्तोळी- बी ए भाग १, हर्षदा धोंडीराम चव्हाण - एम कॉम भाग २,माधुरी महादेव भोसले - बी कॉम भाग २,सरिता व्हनाप्पा मुरगी- एम कॉम भाग १, स्वाती सदाशिव फुटाणे ,अमृता बाळू जाधव ,विद्या सज्जन नगरे, मोनिका राजकुमार आरबोळे सर्व बी.कॉम भाग ३ व कृष्णा चंद्रकांत माने -बी . कॉम भाग २ यांचा समावेश आहे

,

कुमारी ऋतुजा विजय पाटील -बी.एस.सी भाग १, हिला तिच्या खेळातील यशाबद्दल कोल्हापूरचे माजी पालकमंत्री व आमदार बंटी पाटील यांच्या हस्ते विविध क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केलेल्या लोकांना दिला जाणारा कोल्हापूर जिल्ह्याचा 'ब्रँड कोल्हापूर' हा पुरस्कार मिळाला



शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर  आंतर विभागीय मैदानी स्पर्धेत आपल्या कॉलेज ची खेळाडू कू ऋतुजा विजय पाटील , बी एस सी भाग १ हिने १० किमी धावणे स्पर्धेत ब्राँझ मेडल मिळवले




२१ किमी हाफ मॅरैथॉन मध्ये कू ऋतुजा विजय पाटील, बी एस सी भाग १, हिने १ तास २६ मिनिटे वेळ देत रौप्य पदक पटकावले





शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर   आंतर विभागीय मैदानी स्पर्धेत आपल्या कॉलेज च्या मुलांच्या रिले संघाने ४×४०० मीटर  धावणे प्रकारात रौप्य पदक मिळवले तसेच कू  प्रथमेश बाळू आमते ,बी एस सी भाग १, याने २० किमी चालणे शर्यत प्रकारात कास्य पदक मिळवले ,रिले संघात  तेजस संजय  राऊत बी ए भाग १, अभिजित यमाजी  पाटील- एम कॉम भाग १,सागर कुमार मगदूम - बी कॉम भाग२, ऋतुराज विजय पाटील - बी  एस सी भाग १, यलाप्पा कृष्ण शिंदे -बी कॉम भाग २ आदी खेळाडूंचा समावेश होता.








शिवाजी विद्यापीठ विभागीय जलतरण स्पर्ध्येत कु रविराज श्रीकांत मोकाशी ,बी एस सी भाग १ याने ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक या प्रकारात कास्य पदक पटकावले व त्याची आंतर विभागीय स्पर्ध्येसाठी निवड झाली



कार्तिक प्रकाश मगदूम याने शिवाजी विद्यापीठ विभागीय तायक्वांदो स्पर्धेत ६३ किलो वजनी गटात कास्य पदक पटकावले व त्याची आंतर विभागीय  स्पर्धे साठी निवड झाली

शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय पुरुष हॉकी स्पर्ध्येमध्ये  या वर्षी आपला संघ प्रथमच सहभागी झाला होता व त्यातून  "निरंजन गोईलकर " बी.  एस सी भाग १ ,याची रवींद्रनाथ टागोर युनिव्हर्सिटी, भोपाळ येथे झालेल्या पश्चिम विभागीय  आंतर विद्यापीठ हॉकी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघामध्ये निवड झाली



---



दिनांक 13 ते १७ जानेवारी दरम्यान आय टी एम युनिव्हर्सिटी,ग्वालियर या ठिकाणी झालेल्या  पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला हॉकी स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयातील  पाच खेळाडूंची शिवाजी  विद्यापीठ संघामध्ये निवड झाली .त्यामध्ये स्वाती सदाशिव  फुटाणे ,अमृता बाळू  जाधव ,विद्या सज्जन नगरे, मोनिका राजकुमार आरबोळे  सर्व बी.कॉम भाग ३ व कृष्णा चंद्रकांत माने -बी . कॉम भाग २  यांचा समावेश आहे

१७ फेब्रुवारी रोजी विश्वासराव नाईक महाविद्यालय ,बत्तीस शिराळा येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर विभागीय सायकलिंग स्पर्धेत आपल्या कॉलेजच्या मानवी बाळगोंडा पाटील , बी ए भाग ३ हिने उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक पटकावला तसेच यश संतोष बिद्रे - बी कॉम भाग १ याने उत्तेजनार्थ तिसरा व प्रथमेश वसंत देरेकर, बी कॉम भाग -२ याने उत्तेजनार्थ दुसरा क्रमांक पटकवला तसेच सर्व खेळाडूंची ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली



# “डॉ घाळी श्री शरीर सौष्ठव स्पर्धां 2024”












# वार्षिक क्रीडा स्पर्धा 2023-24














नियोजित कामे

- "कै .रत्नमाला घाळी  महिला कबड्डी प्रशिक्षण केंद्र" स्थापन करणे.
- डॉ घाळी श्री शरीर सौष्ठव स्पर्धा तालुका स्तरावर आयोजित करणे.
- गडहिंग्लज फुटबॉल असोसिएशन सोबत सामंजस्य करार करून मुला- मुलींचा प्रवेश वाढवणे व उपक्रम राबवणे.
- १९ वर्षा खालील मुलींसाठी  "कै .रत्नमाला घाळी महिला कबड्डी चषक अयोजीत करणे त्याच्यामाध्यमातून मुलींना प्रवेशासाठी आकर्षित करणे.
- जिल्हा क्रीडा कार्यालयामार्फत मिळणाऱ्या वेगवेगळ्या अनुदानासाठी प्रस्ताव पाठवणे व अनुदान मिळवणे.

